आ. क्र. /94-95

"[illegible]"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.जि.प.शि.वि./माध्य/ए-४/२४-९५
पुणे. दि. १५/७/९४.

BOOK-POST

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
माध्यमिक विद्यालय, खानापूर.
ता. भोर जि. पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने ~~इ. ९ वी~~, १० वी वर्गास परवानगी व वार्षिक तपासणी बाबत. ९४-९५.

आपल्या राजगड ज्ञानपीठ भोर द्वारा संचालित खानापूर येथील माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी चे वर्गास [माध्यम मराठी/~~इंग्रजी~~] सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून शासन आदेश क्र. एस.एस.एन/१०९२/३०३२/माशि-१ दि. १६/५/९२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ९ वी~~, इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गाची सन ९४-९५ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक तपासणी करणेबाबत ~~उपशिक्षणाधिकारी~~, ~~जि. प. पुणे~~ /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोर यांना या कार्यालयाकडून कळविणेत आलेले आहे. तरी आपण आपल्या विद्यालयातील इ. ~~९ वी~~, इ. १० वी च्या वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेबाबत संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व त्वरित पूर्तता करुन घ्यावी. वेळेत वार्षिक तपासणी होवून तपासणी अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्यास सर्वस्वी आपणास जबाबदार समजणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

B.O. 22/7/94 PUNE

२५

५०२०

क्र. माध्य/३/ ९३ /५ वी ते ७ वी/पुवि/९७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दिनांक:- -5 MAY 1997

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद ..पुणे........

विषय:- इ.५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करण्यास परवानगी देणेबाबत..

शाळा:- माध्यमिक विद्यालय खानापूर, ता. भोर

संदर्भ:- आपले पत्र क्र.: शिक्षण/माध्य/ई-४/५वी/९६, दि.३१.१०.९६
संस्थेचे दि.२१.१.९७ चे पत्र.

उपरोक्त विषयाधिन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ.५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्र. एसएसएन/१०८५/२३४८५/ (२४४ एस) माशि-१, दि. २९.४.८६ व २०-१२-८८ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

२) सदर अधिकारांच्या अधिन राहून, खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर -- राजगड ज्ञानपीठ, भोर ------------------- या संस्थेच्या ---- माध्यमिक विद्यालय, खानापूर, ता. भोर ------------ या माध्यमिक विद्यालयात इ.५ वी ते ७ वी चे वर्ग सुरु करण्यास सन ९६ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी:- १) इ.५ वी ते ७ वी वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्वावर राहील.
२) मा.शा.संहिता नियम ३.२. नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरु केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीचे वेळी करावी. व त्या बाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

(स्वाक्षरी)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१ करीता

प्रत:-,
१) मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना सविनय सादर.
२) मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, ----------------
खानापूर, ता. भोर. ----------------

खानापूर

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी/९७.
पुणे, दि. ३०.५.९७

प्रति,
मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, खानापूर.
ता. भोर, जि. पुणे.

विषय :- इ. ५वी ते इ. ७ वी वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करणेस परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- मा. शि.उपसंचा.पुणे विभाग,पुणे यांचेकडील पत्र क्र. माध्य२/१३/५वीते ७वी/पुर्व/९७/५०२०, दि. ५.५.९७.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या माध्यमिक शाळेत इ. ५ वी ते इ. ७ वी चे वर्ग सुरू करणेस जून ९६ पासून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर परवानगी देणेत येत आहे.

अटी = १. इ.५वी ते इ. ७वी च्या वर्गाची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहील.
२. मा.शा.संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

(स्वाक्षरी)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

Recd on 30/5/97

प्रत,
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोर.
योग्यत्या कार्यवाहीसाठी.